# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २००८

सर्वसाधारण गट

## श्री. विजय रामचंद्र गौरत

### मु.गिम्हवणे , पो.दापोली, ता. दापोली, जि.रत्नागिरी



- एकूण क्षेत्र ७ हेक्टर, १.७५ हे. आंबा, १.७५ हे. काजू, ०.५० हे. आवळा, १.५० हे. नारळ, ०.२५ हे. केळी, ०.६५ हे. सुपारी इ. फळपिकांची लागवड
- नर्सरी व्यवसाय सुरू करून आंबा, काजू, नारळ, चिकू, गुलाब, शेवंती, सोनचाफा व इतर फुलझाडे व शोभेची झाडे, वनौषधी झाडे तर सागवान, शिवण, बांबु, जांभूळ, अॅकेशिया या जंगली झाडांची रोपे व कलमे विक्री.
- भात शेतीमध्ये चारसूत्रीचा अवलंब.
- सेंद्रीय शेतमालाची वाढती मागणी लक्षात घेऊन गांडूळखत व बायोगॅस प्रकल्पाची उभारणी व अपारंपारिक ऊर्जा मिळविण्यासाठी सौर ऊर्जा साधनांचा योग्य वापर.
- कुक्कूटपालन व दुग्धव्यवसायाचे प्रशिक्षण घेवून व्यवसाय.
- १४० फूट लांब व ७० फूट रुंदीचा तलाव निर्माण करुन त्यामध्ये गोडया पाण्यातील मत्स्यशेती.
- गावामध्ये स्वच्छता अभियान, दारुबंदी, कुटुंब नियोजन, पिण्याचे पाणी, शैक्षणिक कार्य, गावातील एकजूट, गांव तंटामुक्ती, गावातील लोकांना रोजगार इ. सामाजिक कार्यास बांधिलकी.

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २००८

## सर्वसाधारण गट

## श्री. दिलीप बाबाजीराव देशमुख

### मु. काराव, पो.वांगणी, ता.अंबरनाथ, जि.ठाणे



- संपूर्ण शेतजमिनीचे सपाटीकरण करुन शेतावर बांध बंदिस्ती करुन उताराच्या जमिनीवर काजू ६० झाडे, आंबा २०० झाडे, आवळा २० झाडे, जांभूळ २० झाडे, गवती चहा २०० या कोरडवाहू पिकांची लागवड.
- खरीप हंगामात सह्याद्री या संकरीत भाताची चारसूत्री पध्दतीने लागवड करून ७० ते ७५ क्विंटल उत्पादन.
- स्थानिक बाजारपेठेचा अभ्यास करुन चवळी, मिरची, मेथी अशा भाजीपाला पिकांचे उत्पादन.
- फळझाडाबरोबरच फुलशेतीची आवड असल्याने कागडा, सोनचाफा, चमेली, मदनबाण, गुलाब, जास्वंद, अबोली, मोगरा इत्यादी फुलझाडांची लागवड.
- आंतरपिक पध्दतीने लागवड करून काळेमिरी, तमालपत्र व कढीपत्ता या पिकांचे उत्पादन व जमिनीची सुपिकता टिकविण्याचे दृष्टीने शेताच्या बांधावर ग्लिरिसिडीया, साग व सुरु या झाडांची लागवड.
- माती व पाणी परिक्षण करुन जैविक, सेंद्रीय, गांडूळ व रासायनिक खताचा समतोल वापर व बारमाही पाण्याचे उपलब्धतेसाठी मृद व जलसंधारणाचे विविध उपक्रम.

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २००८

**सर्वसाधारण गट**

## श्री. भबुता बन्सी पटेल

### मु. पो. वेळावद, ता. जि. नंदूरबार



- धारण केलेले एकूण क्षेत्र १०.२६ हेक्टर, जमिनीचे सपाटीकरण करुन बांधबंधिस्ती केली, जमिन मुरमाड व हलक्या प्रतीची असल्याने तलावातील गाळ शेतात टाकून जमीन वहितीयोग्य करुन घेतली.
- जिल्हयात प्रथमच संत्रा लागवडीचा प्रयोग यशस्वी करून दाखविला व आवळा बागेत आंतरपिक म्हणून मिरचीची लागवड.
- शेतीला पूरक व्यवसाय म्हणून दुग्धव्यवसाय करीत असून जनावरांच्या चा□ासाठी गजराज गवताची लागवड.
- सन १९९० पासून त्यांनी सेंद्रीय शेती करण्यास सुरुवात केली असून यासाठी गांडूळ खत प्रकल्प व जिवामृत प्रकल्प उभारला.
- सन २००६ मध्ये तालुका स्तरावरील कापूस पिकस्पर्धेत सहभागी होवून हेक्टरी ५० क्विंटल उत्पादन घेवून प्रथम क्रमांक व सन २००७ मध्ये गहू पिकाचे हेक्टरी ४५ क्विंटल उत्पादन घेवून तालुकास्तरीय पिकस्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला.
- आपल्या गावांत शैक्षणिक व सामाजिक कार्य केले असून ग्रामपंचायतीचे उपसरपंच पदी कार्यरत.

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २००८

**सर्वसाधारण गट**

## श्री. सतिश निंबाजी काटे

### मु. पो. कोळपिंप्री, ता. पारोळा, जि. जळगाव



- चिकू, लिंबू, नारळ, अंजीर, आवळा, पेरु, मोसंबी, आंबा, सिताफळ इत्यादी फळपिके तसेच शेवगा, कढीपत्ता, आले, पुदिना, आळू इत्यादी भाजीपाला पिकांची लागवड.
- झेंडू, तेरडा, चांदणी या फुलपिकांची लागवड करून भरघोस उत्पादन.
- साग, सुरु, बांबू, अशोका, निंब, उंबर, भोकर इ. वनझाडांची लागवड.
- सेंद्रीय पध्दतीने मका, सोयाबीन, गहू या पिकांची लागवड करुन शेतीला पूरक व्यवसाय म्हणून मधमाशी पालन केंद्र उभारले.
- गांडूळ खत प्रकल्प, बिजामृत, जीवामृत, निंबोळी अर्क, दशपर्णी अर्क, वनस्पती द्रवरुप खत, घरच्या घरी बनविलेली किडनाशके फवारणीसाठी वापरतात.
- सेंद्रीय शेतीबाबत प्रशिक्षण व कार्यशाळांमधून शेतक-यांना मार्गदर्शन.

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २००८

## सर्वसाधारण गट

## श्री. राजकुमार नंदलाल शहा

### मु.पो.वडगाव निंबाळकर, ता.बारामती, जि. पुणे



- एकूण जमीन १० हेक्टर असून डाळिंब, ऊस, खरबूज, कलिंगड, केळी, मका, इत्यादी पिकांची लागवड.
- जमीन ही खडक, चोपण व माळरान प्रकारातील असल्याने खडक फोडून पाच एकर क्षेत्रात भगवा जातीचे डाळींब, सात एकर केळी, पाच एकर ऊस, दोन एकर सागवान व पाच एकर मका लागवड.
- केळीची टिश्यूकल्चर पध्दतीने लागवड, पिकांची निवड करताना बाजारभावाचा अंदाज, नविन तंत्रज्ञानाचा अवलंब व पिकांच्या नवीन जातींची लागवड यावर नेहमी भर.
- बाराही महिने कलिंगड व खरबूज या पिकांचे उत्पादन.
- ८० टक्के शेतीसाठी ठिबक सिंचनाचा वापर.
- डाळींबापासून ज्युस तयार करण्यासाठी 'सुरेखा फ्रुट एक्स्ट्रॅक्ट' ही कंपनी सुरु करुन दिल्ली, मुंबई, बेंगलोर व पुणे येथे विक्री.
- डाळींबाच्या निर्यातीसाठी 'श्रीदत्त डाळींब फलोत्पादन संघ' उभारणीत सक्रिय सहभाग.
- परिसरातील शेतक[illegible]ंना सातत्याने चर्चासत्रे, मेळावे आयोजित करुन मार्गदर्शन.

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २००८

**सर्वसाधारण गट**

## श्री. देविदास रामदास मोरे

### मु. पो. बावी, ता. माढा, जि. सोलापूर



- एकूण जमीन ११.८२ हेक्टर असून द्राक्ष, डाळींब, आवळा, ज्वारी, मका, वांगी, कारली या पिकांची आधुनिक पध्दतीने लागवड.
- तालुक्यातील पाण्याचे दुर्भिक्ष विचारात घेऊन ८ लाख लिटर पाणी क्षमता असलेला गोलाकार सिमेंट टँक बांधून पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी साठवून त्याचा सिंचनासाठी वापर.
- एक कोटी लिटर क्षमतेचे शेततळे करून त्या पाण्याचा वापर सायफन पध्दतीने विजेचा वापर न करता ११ एकर क्षेत्रावर सिंचन, तसेच संपूर्ण क्षेत्रावर ठिबक सिंचनाचा अवलंब.
- द्राक्षांची लंडन, हॉलंड, जर्मनी या देशात निर्यात.

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २००८

## सर्वसाधारण गट

## श्री. आप्पासाहेब पांडुरंग पाटील

### मु. पो. मौजे सांगाव, ता. कागल, जि. कोल्हापूर



- जमिन धारणा १.२० हेक्टर, लहानपणापासूनच शेतीबाबत आवड असल्याने आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून विविध पिकांचे उत्पादन.
- ऊसामध्ये आंतरपिके म्हणून कांदा, कोबी, फुलकोबी, मिरची, वांगी, मुळा इत्यादींचे उत्पादन.
- बाजारपेठेचा अचूक अभ्यास, भाजीपाला पिकांच्या अधिक उत्पादनक्षम जातीची लागवड, योग्य खत व्यवस्थापनाद्वारे भरघोस उत्पादन.
- गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डकरीता ८ फूट २ इंच लांबीचे पडवळ गतवर्षी उत्पादीत.
- शेतीबरोबर जोडधंदा म्हणून कुक्कुटपालन व दुग्धव्यवसाय.
- ई टिव्ही, स्टारमाझा, झी न्यूज, व झी २४ तास या वाहिन्या तसेच आकाशवाणी वरून शेतीविषयक कार्यक्रम प्रसारित.
- बळीराजा मासिकातर्फे सन २००७ - उत्तम शेतकरी या पुरस्काराने सन्मानित.

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २००८

## सर्वसाधारण गट

## श्री. जनार्दन संतराम अडसूळ

### मु. पो. तरडगाव, ता. फलटण, जि. सातारा



- धारण केलेले एकूण क्षेत्र ३ हेक्टर, ०.४० हे. क्षेत्रावर आंबा लागवड.
- खरीपामध्ये सोयाबीन, घेवडा, तूर, मका व चारा पिके तर रब्बी मध्ये ज्वारी, गहू, हरभरा व भाजीपाला या पिकांची लागवड तसेच स्वीट कॉर्न व बेबी कॉर्नचे उत्पादन
- १०० टन क्षमतेचा गांडूळखत प्रकल्प असून उत्पादीत ५० टक्के गांडूळ खताचा वापर शेतीसाठी करुन उर्वरीत गांडूळ खताची विक्री.
- आधुनिक कृषि तंत्रज्ञानाचा वापर केल्यामुळे पिकस्पर्धेत सहभागी होऊन यश संपादन.
- सन २००७-२००८ मध्ये राज्य पातळीवरील गहू पिकस्पर्धेत सहभागी होऊन हेक्टरी ७७ क्विंटल उत्पादन.
- शेती व्यवसायास पूरक व्यवसाय - दुग्ध व्यवसाय, रेशीम उद्योग.
- शेतकरी मंडळाची स्थापना केली असून आधुनिक कृषि तंत्रज्ञानाचे शेतक-यांना मार्गदर्शन, चर्चासत्र, मेळावे व शिवारफेरी आयोजन.

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २००८

## सर्वसाधारण गट

## श्री. प्रकाश पांडुरंग घुले

### मु.पो. चिंचखेडा (खुर्द), ता. कन्नड, जि. औरंगाबाद



- धारण केलेले एकूण क्षेत्र ३० हेक्टर, १२ हेक्टर क्षेत्रात मोसंबी, आंबा, सिताफळ, चिकू इत्यादी फळझाडांची लागवड व उर्वरीत प्रक्षेत्रात ऊस, कापूस, मका इत्यादी पिकांची लागवड.
- सिताफळ फळपिकांत भुईमूग व आंबा पिकात सोयाबीन पिकाची आंतरपिक म्हणून लागवड.
- सेंद्रिय खतासाठी गांडूळ खत प्रकल्पाची उभारणी व फळबागेकरीता ठिबक सिंचन संच वापर.
- शेतीला पूरक व्यवसाय म्हणून दुग्धव्यवसाय.
- १० म्हशी व १० गायी असून गोबर गॅस प्रकल्पाची उभारणी.
- विविध कार्यकारी संस्थेचे अध्यक्ष व सुवर्ण पालेश्वर जिनिंग व प्रेसिंग मर्यादितचे संचालक.
- महिला बचत गट व आदर्श गुळ निर्मीती केंद्राची स्थापना.

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २००८

## सर्वसाधारण गट

## श्री. आण्णासाहेब पाटीलबा होंडे

### मु.साडेगाव, पो.गोंदी, ता.अंबड, जि. जालना



- धारण केलेले एकूण क्षेत्र १५.७५ हेक्टर, जमिनीची बांधबंदिस्ती करुन जमिन ओलिताखाली आणून आवळा, चिंच, सिताफळ, मोसंबी या फळपिकांची लागवड.
- विविध पिकांच्या संकरीत व सुधारित जातीच्या बियाण्यांचा वापर करून भरघोस उत्पादन.
- गेल्या ४ वर्षापासून कलिंगडाचे मधुबाला या वाणाची लागवड करुन विक्रमी उत्पादन.
- शेतीला जोडधंदा म्हणून दुग्धव्यवसाय तसेच फळबागेच्या संपूर्ण क्षेत्रासाठी ठिबक सिंचनाचा वापर.
- कृषि विभागामार्फत आयोजित केलेल्या शेतकरी सहलीत सहभाग.

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २००८

## सर्वसाधारण गट

## श्री. सुभाष तुकाराम डुकरे

### मु. विरेगाव, पो. दारेफळ, ता.वसमत, जि.हिंगोली



- धारण केलेले क्षेत्र ९.३५ हेक्टर, मोसंबी २.०० हे., आंबा १.६० हे. व उर्वरीत क्षेत्रामध्ये कापूस, हळद व ऊस या नगदी पिकांची लागवड करुन विक्रमी उत्पादन.
- पाचट कुजविणे, बायोडायनॅमिक पध्दतीने खत तयार करणे, गांडूळ खत, नाडेप खत, हिरवळीचे खत निर्मीती, शेततळे, वनराई बंधारे, विहीर पुनर्भरण इत्यादी उपक्रम.
- सन १९९६ पासून शेतीची दोन टप्प्यात विभागणी करून ८.०० हे. क्षेत्राची पिके संपूर्ण सेंद्रीय पध्दतीने तसेच तालुका पातळीवर कार्यरत असलेल्या ऋषि कृषि निसर्ग शेती मित्र मंडळाचे कोषाध्यक्ष.
- आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा वापर करून तूर, मूग, उडीद, भात, हरभरा, ज्वारी, तीळ, करडई, गहू, भुईमूग इत्यादी पिकांचे उत्पादन.
- शेतीचे तंत्रज्ञानाचा प्रचार व प्रसार करण्यासाठी विविध मासिकातून लिखाण व आदर्श ग्राम विकास मंडळाची स्थापना.

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २००८

## सर्वसाधारण गट

## श्री. सतिश विठ्ठल खडके

### मु. पो. वाघोली, ता. जि. उस्मानाबाद



- धारण केलेले क्षेत्र १०.५७ हेक्टर, त्यामध्ये १.८० हे. क्षेत्रावर डाळींब पिकांची लागवड.
- विविध आंतरपिके घेऊन उर्वरित क्षेत्रामध्ये केळी, ऊस, ज्वारी, खरीप सोयाबीन, रब्बी हरभरा, उन्हाळी भुईमूग या पिकांची लागवड.
- साग व निलगिरीची लागवड तसेच हरभरा पिकाच्या विराट, काबुली, या जातींच्या वाणांची लागवड.
- ऊसाची लागवड पट्टा पध्दतीने करून चांगले उत्पादन.
- शेतीतील मशागतीसाठी पॉवर टिलर या सुधारित अवजाराचा उपयोग.
- शेतीला पूरक व्यवसाय म्हणून दुग्ध व्यवसाय. संकरित गायी असून शेतात गोबर गॅस व गांडूळ खत प्रकल्प उभारणी.

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २००८

सर्वसाधारण गट

## श्री. सिताराम लच्छू जाधव

### मु. वाकद (ई), पो. काळी (दौ), ता. महागाव, जि. यवतमाळ



- धारण केलेले एकूण क्षेत्र १७ एकर ३८ गुंठे, पैकी १७ एकर क्षेत्र बागायती असून संत्रा, केळी, कारली, कापूस, सोयाबीन, मका, गहू व इतर भाजीपाला पिकांची आधुनिक पध्दतीने लागवड.
- सन २००८ खरीप हंगामामध्ये पारस ब्रम्हा या कपाशी जातीच्या वाणाची ४ बाय ३ अंतरावर लागवड करुन एकरी २९.१४ क्विंटल उत्पादन.
- खरीप हंगामात सोयाबीनचे जे.एस.३३५ या वाणाचे बिजोत्पादन.
- पारंपारिक कापूस पिकाबरोबर कारल्याची लागवड करुन एकरी एक लाख रूपयांपर्यंत उत्पन्न.
- शेतीला जोडधंदा म्हणून दुग्धव्यवसाय.
- सेंद्रीय शेतीसाठी गांडूळ खत प्रकल्प उभारणी, सेंद्रीय शेतीतून कापूस पिकाचे एकरी २२ क्विंटल उत्पादन.
- कृषिक्षेत्रातील योगदानाबद्दल सन २००८ मध्ये वसंतराव नाईक प्रतिष्ठान, पुसद यांचेकडून पुरस्कार तसेच सन २००९ मध्ये शेतकरी एकता मंच, वर्धा यांचेतर्फे कृषिनिष्ठ पुरस्काराने सन्मानित.

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २००८

**सर्वसाधारण गट**

## श्री. अरविंद उध्दवराव बेंडे

### मु. रातचांदणा, पो. मुरझडी, ता.जि. यवतमाळ



- धारण केलेले एकूण क्षेत्र ५.९४ हेक्टर, चढ उताराची जमीन असल्याने बांध बंधीस्ती करुन जमिनीचे सपाटीकरण व प्रक्षेत्रावर संत्रा २७७ झाडे, आंबा १० झाडे, बोर २ झाडे, जांभुळ १३ झाडे या फळझाडांची लागवड.
- शेतीला पूरक व्यवसाय म्हणून दुग्धव्यवसाय, गावातील शेतकरी पुरुष गट स्थापन करुन त्यांच्याकडून दुध संकलित करुन नजीकच्या यवतमाळ शहरात विक्री व महिलांसाठी संत तुकडोजी महिला दुग्ध उत्पादक सहकारी संस्थेची स्थापना.
- बचत गटाचे उत्कृष्ट कामगिरीसाठी सन २००८ मध्ये मा. राज्यपाल यांच्या हस्ते सत्कार.
- पाणीटंचाईवर मात करण्यासाठी २ सामूहिक शेततळे तयार केले.
- प्रयत्न व सहकार्यामुळे गावाला मा.राष्ट्रपती यांच्या हस्ते निर्मल ग्राम पुरस्कार प्राप्त.